
दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १३८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.११ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# राज्यात १७ ऑगस्टपासून शाळा सुरु; मार्गदर्शक सूचना जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**कोरोनाची राज्यातील स्थिती हळूहळू सुधारत असताना शाळा देखील सुरु करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहेत. येत्या १७ ऑगस्ट पासून राज्यातील शहरी भागात इयत्ता आठवी ते बारावी व ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते सातवीचे वर्ग सुरक्षितपणे सुरु करण्याबाबत मार्गदर्शक सूचना शिक्षण विभागाने जाहीर केले आहेत.**



राज्याच्या शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी म्हटलं की, शाळा सुरू करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत. मात्र सरसकट आम्ही शाळा सुरू करत नाहीत. ज्या ठिकाणी सुरक्षा आहे त्याच ठिकाणी शाळा सुरू करत आहोत. शिक्षकांचं लसीकरण केलं जाणार आहे. ज्या ठिकाणी कोरोनाचा प्रादुर्भाव आहे त्या ठिकाणी स्थानिक प्रशासन निर्णय घेतील. टास्क फोर्सने जे संगितलं आहे ते समोर ठेऊन हा निर्णय घेत आहोत.

कोरोना मुक्त गावांमध्ये १५ जुलैपासून इयत्ता आठवी ते बारावी वर्ग सुरू करण्यात आले होते. त्यानंतर या ठिकाणी कोरोनाचा प्रादुर्भाव नाही अशा ठिकाणी ग्रामीण भागांमध्ये इयत्ता पाचवी ते सातवीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय शिक्षण विभागाकडून घेण्यात आला आहे. तर शहरी भागांमध्ये इयत्ता आठवी ते बारावी चे वर्ग सुरू करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व इतर शहरी भागात कोरोना परिस्थिती विचारात घेऊन शाळा सुरू करण्याबाबत निर्णय घेण्याबाबत संबंधित महापालिका आयुक्त यांना अधिकार असणार आहे. सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, अहमदनगर, बीड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर या जिल्ह्यातील कोरोना परिस्थिती विचारात घेऊन व अन्य जिल्ह्यांत देखील शाळा सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना अधिकार असतील.

महापालिका क्षेत्रात शाळा सुरू करण्यासाठी खास समिती गठित केली जाईल. समिती शाळा सुरू करण्याबाबतचा निर्णय घेईल. यामध्ये महापालिका आयुक्त हे अध्यक्ष असतील नगरपंचायत, नगरपालिका ग्रामपंचायत, स्तरावर सुद्धा समिती गठीत केली जाणार आहे. यामध्ये जिल्हाधिकारी अध्यक्ष असतील.

## संक्षिप्त...

### ऑनलाईन शॉपिंग करताना ३० हजाराचा गंडा

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

ऑनलाईन आयफोन खरेदी करताना एका नौदल अधिकाऱ्याच्या पत्नीला तब्बल ३० हजार रूपयाचा गंडा घातल्याची घटना करंजा नेव्हीनगर येथे घडली आहे. या प्रकरणी मोरा सागरी पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सुत्रानी दिलेल्या माहितीनुसार दिप्ती कायस्त बब्बर या नेव्ही ऑफिसरच्या पत्नीला महागडा आयफोन खरेदी करायचा होता. त्यासाठी तीने इंटरनेटवर मोबाईल सर्च केला. त्यानंतर त्या महिलेला यु.के. स्कॉटलंड येथून डॉ अलेक्स यांचा एक मेसेज आला आणि आमच्याकडे आयफोन असून त्याची किंमत १ लाख ते ८० हजारापर्यंत असल्याचे सांगून त्या महिलेचा नंबर मागितला. त्यानंतर या नेव्ही ऑफिसरला एका महिलेचा फोन येवून तीने यासाठी ३० हजार कस्टम ड्यूटी ऑनलाईन भरायला लागतील असे सांगून तिच्याकडून ३० हजार रूपये उकळले. आणि उर्वरीत रक्कम भरण्यासाठी तगादा लावला. मात्र या नेव्ही अधिकाऱ्याच्या पत्नीला संशय आल्यानंतर तीने या बाबत मोरा सागरी पोलिस ठाण्यात फसवणूकीची तक्रार दाखल केली आहे.

# रोमी लॉजिंग ॲण्ड बोर्डींगवर अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील रोहिंजण टोल नाक्याजवळ असलेल्या रोमी लॉजिंग ॲ्ण्ड बोर्डींगवर अ.मा.वा.प्र. कक्ष गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करून ७ महिलांना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुमार गौडा (५२), तमन्ना गौडा (५२) हे चालवित असलेल्या रोमी लॉजिंग ॲनण्ड बोर्डींग रोहिंजण टोल नाक्याजवळ लॉजमध्ये काही महिलांना वेश्या व्यवसायासाठी ठेवण्यात येत असून त्यांचा वापर वेश्या व्यवसायासाठी करण्यात येत असल्याची खबर अ.मा. वा.प्र.कक्ष गुन्हे शाखेचे वपोनि सोनावणे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली बनावट ग्राहक पाठवून त्यानुसार त्यांची खात्री पटल्यावर विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून ७ महिलांसह गौडा यांना ताब्यात घेतले आहे. व त्या ठिकाणाहून रोख रक्कम व इतर वस्तू असा मिळून २ हजाराचा ऐवज हस्तगत केला आहे.

# उरण तहसिलवर क्रांतिदिनी विविध संघटनांचा वाढत्या महागाई विरोधात मोर्चा



**दै.रायगड नगरी । उरण**

क्रांतीदिनी सीटू, अ.भा.जनवादी महीला संघटना, डी.वाय.एफ.आय. व अ.भा.किसान सभा रायगड जिल्हा कमिटीच्यावतीने उरण तहसिल कचेरीवर मोदी हटाव देश बचाव संविधान वाचवा, देश वाचवा अशा घोषणा देत उरण चार फाटा ते तहसिल कार्यालय दरम्यान मोर्चा निघाला. या मोर्चात शेकडो कामगार, महीला, शेतकरी, युवक आप आपल्या संघटनांचे झेंडे व मागण्यांचे फलक, बॅनर घेऊन सहभागी झाले होते.

उरण तहसिल कार्यालयावर मोर्चा पोह-ोचताच सर्व प्रथम दिल्लीच्या सीमेवर चालू असलेल्या आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्या सुमारे ५५० शेतकरी हुतात्म्यांना, नुकताच झालेल्या पुर व दरडी कोसळल्याने मृत्यू मुखी पडलेल्या नागरीकांना श्रद्धांजली अर्पण केली. उरण तहसील कार्यालया समोर झालेल्या सभेत केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांचा, शेतकरी व कामगार कायदे रद्द करा व वीज विधेयक मागे घ्या यासंबंधीची सविस्तर मांडणी सीटूचे राज्य सेक्रेटरी कॉम्रेड भूषण पाटील यांनी केली.

महिला संघटनेच्या नेत्या हेमलता पाटील यांनी लसीकरण मोहीम, आरोग्य सुविधा, रेशन व्यवस्थेतील भ्रष्टाचार, गॅस, पेट्रोल, डीझेल, जीवनावश्यक वस्तूंच्या प्रचंड दरवाढीच्या विरोधात संताप व्यक्त केला. किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड संजय ठाकूर यांनी गेल्या दिड वर्षात देशात निर्माण झालेल्या समस्यांचा पाढा वाचला. मोदींचे सरकार जनतेला दिलासा देण्यात अपयशी ठरल्याचे स्पष्ट केले. त्यांनी राष्ट्रपतींना द्यावयाच्या निवेदनातील मागण्या मोर्चेकऱ्यांसमोर मांडल्या.

या शिवाय उरण तालुक्यातील विविध समस्यांचा उहापोह केला व तोडगा काढण्यासाठी मा.उरण तहसिलदार यांना बैठकीचे .../२

# शिवसेना नवीन पनवेल पाणी प्रश्नावर आक्रमक

## मार्ग नाही निघाला तर सिडकोला टाळं ठोकणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बरेच दिवसापासून नवीन पनवेल विभागात येथील नागरिक पिण्याच्या स्वछ पाण्याच्या उपलब्धतेच्या मूलभूत हक्क अधिकारापासून वंचित आहेत त्याचा उद्रेक होऊन महिलांनी नवीन पनवेल शिवसेना युवा सेना व महिला संघटनेच्या नेतृत्वात सिडको ऑफिस नवीन पनवेल येथे पाणी विभागाचे अभियंता सागर जगदाळे यांच्या ऑफिस वर मोर्चा नेऊन आपल्या मागण्याचे निवेदन दिले.

विभागात गढूळ पाणी येते, पाणी पुरवठा नियमित नसून, अतिशय तुटवडा भासत असल्याने कित्येक ठिकाणी मोटरपम्प लावून पाण्याचा उपसा होतो व इतरांना पाणी उपलब्ध होत नाही. जगदाळे यांनी ह्या विषयावर उच्चपदास्थाशी विचार विनिमय करून विभागातील पाण्याचे प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न करू असे आश्वासन दिले. या प्रसंगी यतीन देशमुख उपमहानगरप्रमुख शिवसेना (नवीन पनवेल व पनवेल) तसेच सौ. अपूर्वा प्रभू महिला शहर संघटिका, सौ सुगंधा शिंदे, संजय गोवेकर विभाग संघटक, ज्ञानेश्वर भंडारी उप शहर संघटक, राजेश वायंगणकर उपविभागप्रमुख, युवासेना पदाधिकारी सिद्धेश गुरव, कैलास कांदळकर, जेष्ठ शिवसैनिक जयंत पाखरे तसेच सर्व शिवसैनिक, महिला आघाडी व युवासेना पदाअधिकारी उपस्थित होते.




# संरक्षक कठड्या अभावी वाहने कलंडण्याचे प्रकार सुरूच : वेलशेत जवळ पुन्हा अपघात

## रिलायन्स कंपनी व सार्वजनिक बांधकाम खात्याने उपाययोजना करण्याची गरज

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे-शिहू मार्गावरील नागोठण्याहून वेलशेतकडे जाणाऱ्या रस्त्यावर धोकादायक ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला संरक्षक कठडे नाहीत. त्यामुळे याठिकाणी लहान-मोठी व अवजड वाहने रस्त्याखाली जाऊन कलंडून अपघात होण्याचे सत्र सुरूच आहे.



मंगळवारी (दि.१०) सकाळी पुन्हा एकदा एक महाकाय ट्रक चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्याच्या खाली येऊन कलंडले. याठिकाणी वारंवार अपघात होत असतांनाच सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी डोळ्यांवर पट्टी बांधली असल्याने स्थानिक नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

अतिशय वर्दळीचा असलेल्या या रस्त्यामध्ये वेलशेत नागोठणे अंबा नदी वरील पूल व रोहा फाटा येथील पूल हे दोन्हीं पूल भरावं टाकून उंच केले आ-हेत. पण रस्त्याच्या बाजूला साईड पट्टी नाही. या रस्त्यावरूनच ओव्हरलोडच्या गाड्या ये-जा करीत असतात. रिलायन्स कंपनीत येणाऱ्या अवजड वाहनांमुळेच हा रस्ता वारंवार खराब होत असून अपघातास कारणीभूत ठरत आहे. याच रस्त्यावरून स्थानिक मच्छीमार ये-जा करीत असतात व शेतकरी आपली गुरे-बकऱ्या चरायला नेत .../२

# ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते महाआवास अभियान पुरस्कार वितरित

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुकास्तरीय महाआवास अभियान पुरस्कार सन २०२०/२१ अंतर्गत लाभार्थ्यांना पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते श्रीवर्धन नगरपालिका कार्यालयात प्रदान करण्यात आले. सदर पुरस्कार तालुका स्तरीय असून तालुक्यात उत्कृष्ट घरकुल बांधलेल्या लाभार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.




सदर पुरस्कार प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत आवास योजना याप्रमाणे वितरित करण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजना पुरस्कार दीपाली दत्ताराम काळतळकर रा. खारगाव जनार्दन कमळ्या बेंडुक रा. दिघी सुलभा रामभाऊ आंबेकर रा. सायगाव याना तर राज्य पुरस्कृत आवास योजना पुरस्कार दीपक गंगाराम पवार, रा हरवीत गुरुदास राजेश जाधव रा. कुडगाव जयश्री नरेश वाघमारे रा. कार्ले यांना सदर पुरस्कार देण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष फैसल हुर्जुक, महंमद मेमन माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक, तालुका अध्यक्ष दर्शन विचारे गटविकास अधिकारी उद्धव होळकर, सहाय्यक गट विकास अधिकारी बाळासाहेब भोगे, पंचायत समिती सदस्य मंगेश कोमनाक आदी मान्यवर उपस्थित होते.

# ऑक्सिजन बाबतीत महाराष्ट्र देशातील पहिले स्वयंपूर्ण राज्य ठरेल : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । ठाणे**

दुसऱ्या कोरोना लाटेमध्ये ऑक्सिजनअभावी विविध अडचणींचा सामना रुग्णाला करावा लागला. आता संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये ऑक्सिजनची कमतरता भासू नये यासाठी प्रत्येक जिल्ह्याने ऑक्सिजनबाबत स्वयंपूर्ण व्हावे यासाठी युद्धप-तळीवर काम चालू आहे महाराष्ट्र हे देशातील ऑक्सिजन बाबतीत स्वयंपूर्ण होणारे पहिले राज्य ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

मीरा-भाईंदर येथील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण करण्यात आले त्यावेळी



मुख्यमंत्री श्री.ठाकरे बोलत होते. यावेळी नगरविकास मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे आमदार प्रताप सरनाईक मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे नगरसेवक आदी उपस्थित होते.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेने विविध लोकोपयोगी विकासकामे केलेली आहेत, यामध्ये जलतरण तलाव तसेच नाट्यगृह यांचे काम प्रगतिपथावर आहे. मीरा-भाईंदर भागांमध्ये कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आमदार प्रताप सरनाईक यांच्या कामाच्या माध्यमातून लोकोपयोगी कामे करण्यात आली आहेत आणि भविष्यामध्ये केली जाणार आहेत असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

कोरोना काळामध्ये सर्वात प्रथम ठाणे जिल्ह्याने ऑक्सिजन प्रकल्प उभारला होता यामुळे ठाणे जिल्ह्याने ऑक्सिजन बाबतीत स्वयंपूर्ण झालेला पहिला जिल्हा होण्याचा मान मिळविला .../२

# विजेच्या लपंडावाने जांभूळपाडा व परळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ हैराण

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा व परळी पंचक्रोशीतील ग्रामस्त मागील वर्ष वीज समस्येचा सामना करत आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघत नाही, त्यामुळे ग्रामस्त संतापले आहे. या विभागातील अनेक गावांत मागील अनेक दिवसांपासून वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. परिणामी ग्रामस्थांची मोठी गैरसोय होते. त्यामुळे विनाकारण वीजपुरवठा खंडित करून नये अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे. या संदर्भातील निवेदन जांभूळपाडा वीज महावितरण कार्यालयात देण्यात आले आहे.

या निवेदनात म्हंटले आहे की वीज महावितरणचा भार नियमन करण्याचा वार मंगळवार आहे. मात्र त्या दिवसा व्यतिरिक्त देखील कित्येक तास वीज घालवली जाते. रात्री एकच्या दरम्यान व पहाटे पाच च्या सुमारास सर्वात जास्त वेळा वीज जाते. त्यातच .../२

# माणगावात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । माणगाव**

रानावनात, डोंगरदऱ्यात काबाडकष्ट करून सन्मानाने राहणाऱ्या आदिवासी समाजाचा आत्मसन्मानाचा दिवस म्हणजे जागतिक आदिवासी दिन होय. ९ ऑगस्ट रोजी हा दिवस संपूर्ण जगभर साजरा केला जातो. याच धर्तीवर दक्षिण रायगड आदिवासी हितरक्षक संघटना व रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने माणगावच्या आश्रम शाळेत जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.

यामध्ये आदिवासी बांधवांच्या पारंपरिक नत्य,कला संस्कृतीचे सादरीकरण करण्यात आले. रायगड भूषण शाहीर चंद्रकांत बुवा कदम यांनी कुमशेत आदिवासी वाडीवरील तरूण मुलांच्या माध्यमातून जाखडी नत्य (बाल्या डान्स) हा नत्य कला प्रकार सोमजाई कला पथकाने सादर केले.

त्याचबरोबर पारंपरिक नत्य व संगीत वादयाच्या तालावर येरद, कंभार्ते, सरले, तारणे, शिरवली आदिवासी वाडीवरील महिलांनी आपल्या पारंपरिक खालू बाज्यावरील विविध आदिवासी नत्य सादर केले. यामध्ये विशेष म्हणजे खालू बाज्या या पारंपरिक वादयानी मोठी रंगत आणली.

आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी झटणारे पोलीस खात्यातील गोरेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण संभाजी नावले, कोलाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष जाधव, माणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकरशिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे महादेव सखाराम जाधव, विधी विभाग ॲड. योगेश तेंडुलकर, सामाजिक क्षेत्रातील संजय घाग, युवकांचे नेतृत्व रोहन शिर्के, संतोष सुतार, विश्वास निकम, शाहीर चंद्रकांत बुवा कदम, पापाशेठ फोपलूनकर ,फादर रिचर्ड कॉडरस यांना समाजाकडून शाल श्रीफळ पुरस्काराचे सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी तालुक्यातील सर्वच आदिवासी वाड्यातून समाजबांधवांनी प्रातिनिधिक स्वरुपात हजेरी लावून कार्यक्रम संपन्न केला. याखेरीज सर्वच पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. सामाजिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण शिक्षण घेणाऱ्या अल्पेश पवार ने समाजाचे उदबोधन केले .कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते समाजाची बुलंद तोफ ,अभ्यासू व्यक्तिमत्त्व लढवय्ये दिनेश कातकरी यांनी आदिवासी समाजाच्या दिशा व दशा या विषयावर मौलिक मार्गदर्शन केले.

उपस्थित समाजाला मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण नावले यांनी आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आपले हक्क, अधिकार याबरोबरच कर्तव्याची जाणीव आपण सर्वांनी ठेवावी. आपल्या समाजाचा विकास व्हायचा असल्यास आपल्या मुलांना आपण शिकवले पाहिजे, शिक्षणाने माणूस मोठा होतो. म्हणून शिका, संघटित व्हा.शिक्षण घेण्यासाठी अडसर निर्माण झाल्यास आमचे सहकार्य घ्या. आम्ही सहकार्य करू. पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांनी आपण डॉ. राजेंद्र भरूड यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिक्षण घ्या. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही ते आय ए.एस झाले. स्वतः वर विश्वास ठेवा. व्यसनांपासून दूर रहा ,अंधश्रद्धेला थारा देऊ नका ,आप आपसातील मतभेद सामोपचाराने सोडवा. वेळ व पैसा वाया घालवू नका ,शासकीय योजनांचा अभ्यासूपणे लाभ घ्या असे सांगितले.

# सुधागड तालुक्यातील बेकायदेशीर गौणखनिज खाणीं विरोधात मनसे आक्रमक

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात बेकायदेशीरपणे चालू असलेल्या दगडखाणी व खडी क्रशरवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मनसे वाहतूक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष महेश सुधाकर पोरे यांनी केली आहे. या तक्रारीचे निवेदन त्यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे नुकतेच दिले आहे. आहे.



या निवेदनात म्हटले आहे की सुधागड तालुक्यातील अनाधिकृत दगड खाणी व खडी क्रेशर वनखात्याच्या परवानगी व प्रदूषण नियंत्रण महामंडळाची परवागी न घेता राजरोजपणे सुरू आहेत. सदरच्या दगड खानी व खडी क्रशर इकोसेन्सिटिव्ह झोन क्षेत्रात येतात. या बरोबरच सुधागड तालुक्यात अभयारण्य २०१४ साली घोषित करण्यात आले आहे. शिवाय बरेचसे गौणखनिज हे सुरुंग लावुन काढले जात आहेत. त्यामुळे वन्याजीवांना ही धोका आहे. त्या दगड खाणी व खडी क्रशर व्यावसायिकांना ज्या अटी-शर्ती वरती परवाना दिला जातो. त्या अति शर्तीची देखील उल्लंघन होतांना दिसत आहे. हे महसूल विभागाच्या अधिकारी या अटीशर्तीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करतांना दिसत आहेत. सुधागड तालुक्यामध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या दगड खाली खडी क्रेशर महसुल अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळे चालू असल्याचा गंभीर आरोप देखील या निवेदनात केला आहे. सुधागड तालुक्यामध्ये बेकायदेशीरपणे चालू असलेला दगड खाण्यावर व खडी क्रेशर त्या कोणाच्या आशीर्वादामुळे सुरू आहेत? महसूल विभागाचे अधिकारी त्यांना अभय का देतात ?असे अनेक प्रश्न पडले असून आहेत असे महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष महेश पोरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. याबाबत सुधागड तालुक्यामध्ये बेकायदेशीरपणे चालू असलेला दगड खाणे क्रशर यावर कारवाई करण्यात आली नाही. तर जनहितयाचीका दाखल करणार असे देखील पोरे यांनी सांगितले.


## पनवेल महानगरपालिका, पनवेल

ई-निविदा सूचना क्र. : पमपा/सा.बां. (उद्यान)/६६२१/प्र.क्र.०७/१४२/२०२१ दि.१०/०८/२०२१

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | कामाचा कालावधी | कामाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | PMC/PWD(UGD)/05/2021-22 | ८,२४,००९/- | ९० दिवस | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील इदगाह मैदान येथे चैन लिंक फेन्सिंग करणे |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शसनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१२/०८/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**



मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

अर्जदाराचे वकील
ॲड.स्वप्नील ठाकूर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज क्र.८०६/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.१३/०९/२०२१

श्री.शांताराम कोंड्या उर्फ कोंडीबा भोईर — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुपग्रामपंचायत भिंगार — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आई कै.चंद्रभागा कोंड्या उर्फ कोंडीबा भोईर यांचा मृतयू दि.२५/०१/१९८९ रोजी मौजे : भिंगार, पो.अजिवली, ता.पनवेल, जिरायगड येथे राहत्या घरी झाला आहे. अर्जदार यांनी आपली आई कै.चंद्रभागा कोंड्या उर्फ कोंडीबा भोईर, हिच्या मृत्यूची नोंद होणे करिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. पवेल यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.चंद्रभागा कोंड्या उर्फ कोंडीबा भोईर, ह्या मयत आहे किंवा कसे? हे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून एक महिन्याचे आत मे.न्यायालयात स्वतः अथवा त्यांचे वकील किंवा कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपल्या हरकती नोंदवाव्यात. या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू १ महिन्याचे मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू मे.न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू मयताचे मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश देण्यात येईल.

आज दि.१०/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



# Kamalgauri Hiru Patil Shikshan Sanstha

Plot No. 29, Sector-11Taloja, CIDCO Node, Navi Mumbai-410208

**WALK IN INTERVIEW**

Applications are invited for the following post of Assistant professor in various following institute for the academic year 2021-22

## S.V.COLLEGE OF ARTS COMMERCE & SCIENCE

Affiliated to University of Mumbai

| Subject | Designation | No. of Post | Nature of Post | Eligibility |
|---|---|---|---|---|
| | Principal | 1 | Full Time | NET/ SET /Ph.D. 15 yearsTeaching Experience |
| Economics | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Geography | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| History | Asst. Professor | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Physics | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET /Ph.D. |
| Botany | Asst. Professor | 02 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Chemistry | Asst. Professor | 06 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Commerce | Asst. Professor | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Accounts | Asst. Professor | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Information Technology | Asst. Professor | 06 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Management | Asst. Professor | 03 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| | Librarian | 01 | Full Time | NET/ SET / Ph.D. |
| Mathematics | Asst. Professor | 01 | CHB | NET/ SET / Ph.D. |
| English | Asst. Professor | 01 | CHB | NET/ SET /Ph.D. |
| Marathi | Asst. Professor | 01 | CHB | NET/ SET / Ph.D. |
| Non teaching Staff | | | | |
| | | 01 | Full Time | Any Post Graduation |
| Accountant | | 01 | Full Time | B.Com. GDC & A |
| Clerk | | 04 | Full Time | Graduation & Typing |
| Peon | | 04 | Full Time | 10th pass |
| Lab assistant | | 02 | Full Time | B.Sc. |

## B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY

BACHELOR OF PHARMACY (B PHARMACY)
DIPLOMA OF PHARMACY (D PHARMACY)
(Affiliated to MSBTE,DTE,Appiroved by Pharmacy Act1948)

| Designation | Post | Qualification |
|---|---|---|
| Principal | 01 | M.Pharm PH.D.With 10Years Experience |
| Associate Professor | 03 | B.Pharm/M.Pharm(Experience /Fresher) |
| Laboratory technician | 01 | D.Pharm(Experience /Fresher) |
| Lab Assistant | 04 | B.sc (Experience /Fresher) |
| Office superintendent | 01 | Degree(Experience /Fresher) |

*Qualifications & Experiences per AICTE&PCI Norms respectively
Industrial Experience will also be considered
Note Gandidate may mail their resumes to kghpss.2019@gmail.com

## Babandada Patil College of Nursing

Email : babankpatil100@gmail.com

Applications are invited for the following post of the Academic Year 2021 - 22. Qualified Candidate should present with original documents.

| Sr. No. | Post | No. Post | Eligibility |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | M.Sc. Nursing with 3 years of teaching experience or B.Sc. Nursing with 5 years of teaching experience |
| 2 | Vice Principal | 1 | M.Sc. Nursing or B.Sc. Nursing with 3 years of teaching experience |
| 3 | Tutor | 3 | M.Sc. Nursing or B.Sc. Nursing or Diploma in Nursing Education and Administration with 2 years of teaching experience |
| 4 | Additional Tutor for Interns | 2 | M.Sc. Nursing or B.Sc. Nursing or Diploma in Nursing Education and Administration with 2 years of teaching experience |

## BALASAHEB THACKERAY LAW COLLEGE

Affiliated to University of Mumbai

| Sr No. | Cadre | Subject | Total No.Of Post | Post Reserved For: OPEN | SE | ST | DT /NT | OBC | SEBC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Asst.Professor | Law | 18 | 10 | 03 | 01 | - | 04 | - |
| 2 | Labrarian | | 01 | 01 | - | - | - | - | - |
| 3 | Accountant | | 02 | 01 | 01 | - | - | - | - |

Note - Eligible Candidate should present with original documents. & Xerox Copy

**Contact**
9594535370
9322789977
9137174559

**Date of Interview:**
**13 and 14 / August 2021**

**Venue :** Plot No. 29, sect-11, Taloja Phase -1
Tal. Panvel Dist. Raigad

Chairman
**Shri. Baban Patil**
Kamalgauri Hiru Patil Shikshan Sanstha



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.बाळकृष्ण शांताम घरत रा.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे विद्यमान मालक / कब्जेदार श्री.रवींद्र लक्ष्मण म्हात्रे यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मौजे | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चिरनेर | २४८ | ७ | ००.०८.०० पो.ख. ००.००.०० एकूण ००.०८.०० | ०.१६ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : १०/०८/२०२१

**सही/-**
**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**अे-६३, रुम नं.१०, सेक्टर १**
**जेएनपीटी कॉलनी, द्रोणागिरी नोड,**
**ता.उरण, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरण तहसिलवर क्रांतिदिनी विविध संघटनांचा वाढत्या महागाई विरोधात मोर्चा

आयोजन करण्याची मागणी केली. तर सीटूचे नेते शशी यादव यांनी केंद्र सरकारने गेल्या सात वर्षांत जनता विरोधी घेतलेल्या निर्णयांचा पाढा वाचला. मोदींचे सरकार हाकलून देऊ या. आपली एकजूट अधिक भक्कम उभारु या असे आवाहन केले.

उरण तहसिलदार यांना निवेदन देण्यासाठी सीटूचे नेते कॉम्रेड भूषण पाटील, कॉम्रेड मधुसूदन म्हात्रे, किसान सभेचे रामचंद्र म्हात्रे, जनवादी महिला संघटनेच्या नेत्या हेमलता पाटील,उषा म्हात्रे,गीता पाटील यांचे शिष्टमंडळ भेटले. त्यानंतर तहसिलदार यांचे सोबत झालेले चर्चेचे इतिवृत्त आंदोलकांना सांगितले कॉम्रेड मधुसूदन म्हात्रे यांनी संबोधित केले व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## संरक्षक कठड्या अभावी वाहने कलंडण्याचे प्रकार सुरूच

असतात. या परिसरात औद्योगिक क्षेत्र व आदिवासी वाड्या आहेत. मात्र नागोठणे-अलिबाग अशा दोन-तीन फेऱ्या वगळता येथे एस.टी ची नियमित सेवा नसल्याने येथील मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार वर्ग व आदिवासी बांधव याच रस्त्यावरून चालत ये जा करीत असतात. या सर्वांनाच आपला जीव मुठीत घेऊनच या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे रिलायन्सनेच त्यांच्या सीएसआर फंडातून याठिकाणी संरक्षण कठडे बांधावे किंवा सेफ्टी बेरीग्रेट लावावे अशी मागणी येथील स्थानिक नागरिक, शेतकरी तसेच मच्छीमार बांधवांची मागणी करीत आहेत. याठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजुला मोठ्या प्रमाणात खोलगट भाग असुनही येथे असलेल्या वळणामुळे वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. तसेच येथील रस्त्याच्या दोन्ही बाजुला संरक्षक कठडेही नसल्याने वाहने वारंवार रस्त्याखाली जाऊन कलंडलण्याचे प्रकार होऊन अपघात घडत आहेत. यापुर्वीही येथील रिलायन्स कंपनी कडे जाणारे रसायन वाहू टँकर कलंडल्याने त्यामधील रसायनांची गळती होऊन ते रसायन शेतक-यांच्या शेतात गेल्याने त्यांचे नुकसान झाले आहे. मात्र शेतक-यांना कुणाकडुनही नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे शेतक-यांतुनही बांधकाम खात्याच्या व रिलायन्स कंपनीच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान वेलशेत गावाकडे जाणा-या या रस्त्यावरील धोकादायक ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजुला सार्वजनिक बांधकाम खात्यान लवकरात लवकर संरक्षक कठडे बांधण्यासाठी रिलायन्स कंपनी व सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे पिगोंडे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष कोळी यांनी सांगितले.

## ऑक्सिजन बाबतीत महाराष्ट्र देशातील पहिले स्वयंपूर्ण राज्य ठरेल : मुख्यमंत्री

आहे. मागील लाटेचा अनुभव पाहता संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये कोणताही रुग्ण ऑक्सिजनपासून वंचित राहणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला. कोरोनामुक्त गाव ही संकल्पना राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात राबविण्याची आवश्यकता आहे. प्रत्येकाने आपले गाव कोरोनामुक्त ठेवण्यासाठी प्रयत्न केले तर महाराष्ट्र नक्कीच कोरोनामुक्त होईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला.

## विजेच्या लपंडावाने जांभूळपाडा व परळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ हैराण

मागील ४ महिन्यांपासून पथदिवे बंद आहेत. अशा परिस्थितीत जीवित व मालमत्तेच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी मंगळवार सोडून इतर दिवशी वारंवार व दीर्घकाळ वीज पुरवठा खंडित करू नये अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदन देतेवेळी ॲड. प्रवीण कुंभार, महेश ठाकूर, केतन देसाई, मंगेश वाघमारे व बबन बाटेटिकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.


मा.पांडे साहेब कोर्ट

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.७९४/२०२१
ने.ता.०९/०९/२०२१

सौ.चंदा सुनील शिरोही उर्फ सुरेही
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जे.टी.पाटील निवास रा.मु.पो.खारघर गाव,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका
विभाग-खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कुमारी. आरती सुनील शिरोही उर्फ सुरेही हिचा जन्म २५/०१/२०१५ रोजी श्रीमती. चिमाबाई बळीराम भगत यांच्या चाळीमध्ये मु.पो.खारघर गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कुमारी.आरती सुनील शिरोही उर्फ सुरेही यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणी बद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.०९/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : मोसारे, तालुका : पनवेल, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत वा जमीन ही आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मोसारे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| राजेश जनार्दन शिंदे शरद जनार्दन शिंदे | २१/४ | भोग. वर्ग १ | ०-४५-९० पोटखराबा ०-०५-४० एकूण क्षेत्र ०-५१-३० | ६.२५ |
| | | पैकी क्षेत्र | ०-३९-९० पोटखराबा ०-०५-४० एकूण क्षेत्र ०-४५-३० | ६.२५ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १०/०८/२०२१

**सही/-**
**ॲड.सतीश स. फडके**
**(ॲडव्होकेट-हायकोर्ट)**
**ऑफिस नं.बी-२, प्लॉट नं.१०४,**
**धवलगिरी को.ऑ.हौ.सो., पिसपार्क**
**हॉटेलजवळ, पनवेल, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०६**
**मोबा नं.८८९८२१७५५५**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कंटेनर चालकाला मारहाण करून लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका कंटेनर चालकाला मारहाण करून लुटल्याची घटना पनवेल तालुक्यातील धानसर गावाच्या हद्दीत घडली आहे. चंद्रवीर चौधरी (६०) हे पहाटेच्या वेळी त्यांच्या ताब्यातील मोटार कंटेनर क्र.एनएल-०१-एई-६५३७ हा घेवून धानसर गावाच्या हद्दीत उभा करून सेफ इंटरप्रायझेस कंपनीचा पत्ता विचारण्यासाठी खाली उतरले असता दोन अज्ञात इसम त्यांच्या जवळ आले व त्यांनी आपसात संगनमत करून त्यांना जबरी मारहाण करून त्यांच्या खिशातील ५०० रुपये काढून घेवून ते पसार झाले आहेत.

## २१ साळी कुटूंबियांना दिला आर्थिक मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । महाड**

महाडमध्ये २२ जुलै रोजी झालेल्या महाप्रलयाने महाड वासियांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. अनेकांचे संसार उध्वस्त झाले. सर्व जनजीवन विस्कळीत झाले. आता काहीशी परिस्थिती हळूहळू पूर्वपदावर येऊ पहात आहे. अनेक सामाजिक, अध्यात्मिक संस्था, मंडळ व दानशूर व्यक्तींनी सढळपणे मदतीचा हात पुढे केला आहे. त्यामध्ये महाड येथील पूरग्रस्त साळी बांधवांच्या मदतीला श्रीवर्धन तालुक्यातील रानवली येथील श्रीक्षेत्र वरदविनायक गणेश मंदिर रानवली ट्रस्टच्या तर्फे २१ कुटूंबियांना आर्थिक मदत पुढे केली आहे.

# कामगार उत्कर्ष सभेच्या उपाध्यक्षपदाची धुरा हनुमंत तथा नाना जगताप यांच्याकडे

## स्व. माणिकराव जगताप यांचा आदर्श ठेवून कामगार वर्गाला न्याय देण्याचा संकल्प

**दै.रायगड नगरी । महाड**

काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आणि महाडचे माजी आमदार माणिकराव जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्याकडे असलेली कामगार उत्कर्ष सभेच्या उपाध्यक्षपदाची धुरा त्यांचे बंधू आणि काँग्रेसचे युवा नेते हनुमंत तथा नाना जगताप यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. कामगार उत्कर्ष सभेचे अध्यक्ष जितेंद्र जोशी यानी आज हनुमंत जगताप यांना या पराचे नियुक्तीपत्र दिले. स्व. माणिकराव जगताप यांनी कामगार क्षेत्रात दिलेल्या यो-गदानाचा आदर्श समोर ठेवून या पदाला आणि कामगारांना न्याय देण्याचा अविरत प्रयत्न आपण करू अशी ग्वाही त्यांनी या नियुक्तीनंतर बोलताना दिली. गेली तीस ते पस्तीस वर्षे स्व. माणिक जगताप हे कामगार उत्कर्ष सभेच्या माध्यमातून कामगार क्षेत्रात सक्रीय होते. कामगार उत्कर्ष सभेचे कोकण विभाग संघटक आणि नंतर उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. संघटनेच्या




माध्यमातून औद्योगिक वसाहतीमधील कामगाराना न्याय देण्याचे , व्यवस्थापनाकडून कामगारांच्या मागण्या मान्य करुन घेण्याचे काम स्व. माणिक जगताप यांनी प्रभावीपणे केले होतेच; राजकीय व्यासपिठावर आमदार म्हणून काम करित असताना कामगारांना किमान वेतन मिळण्याचा हक्क देखील त्यांनी प्राप्त करुन दिला होता. कंत्राटी कामगार पध्दती बंद व्हावी अशी आग्रही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली होती. वीटभट्टी कामगार, रेती कामगार , बांधकाम मजूर अशा असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळवून देण्याचे काम देखील स्व. माणिकराव जगताप यांनी केले होते. २६ जून रोजी माणिकराव जगताप यांचे अनपेक्षित निधन झाले. त्यामुळे रिक्त झालेल्या पदावर हनुमंत जगताप यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. आज कामगार उत्कर्ष सभेचे अध्यक्ष जितेंद्र जोशी यांनी हनुमंत जगताप यांना त्यांच्या निवारस्थानी जावून नियुक्तीपत्र दिले. यावेळेस महाडच्या नगराध्यक्ष स्नेहल जगताप, विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीयश जगताप उपस्थित होते. स्व. माणिकराव जगताप यांची उणीव भरुन निघणारी नसली तरी हनुमंत जगताप त्यांच्याच तडफेने काम करुन कामगारांना न्याय देण्याचे काम करतील असा विश्वास यावेळेस जितेंद्र जोशी यांनी व्यक्त केला. संघटीत आणि असंघटीत अशा दोन्ही क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांवर आपण काम करु , त्यांना न्याय मिळवून देवू अशी ग्वाही या नियुक्तीनंतर हनुमंत जगताप यांनी दिली.

# नाग देवतांची कला जिवंत ठेवणारे चिरनेर गावातील गोरे कुटुंब

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

नागपंचमी हा सन मोठ्या भक्तिभावाने संपूर्ण देशामध्ये साजरा केला जातो. श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील पाचव्या दिवशी नागपंचमी साजरी केली जाते.यावर्षी शुक्रवार दि १३ आँगस्ट २०21 रोजी नागपंचमी उत्सव आल्याने चिरनेर कला नगरातील गोरे कुटुंबांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही नागदेवताच्या मातीच्या मूर्ती घडविण्याचे काम हाती घेतले आहे.



नागपंचमीच्या दिवशी सुहासिनी या आपल्या कुटुंबाला, भाव-ला सुख-शांती, समाधान, आयुष्य वाढण्यासाठी शेत,मालरानात जाऊन नागाची पूजा करतात, तसेच माती पासुन बनवलेल्या नाग देवतांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना आप आपल्या घरात करून पुजा केली जाते व त्यांचा आशीर्वाद घेतला जातो. भातशेतीचे नूकसान उंदीर मोठ्या प्रमाणात करत असतात,अशा उंदरांपासून शेतीतील पिकांचे रक्षण नाग देवता करत असल्याने नाग हा शेतकऱ्यांचा हि मित्र आहे.त्यामुळे अनेक शेतकरी हे नागपंचमी उत्सवाचे औचित्य साधून नागदेवताची पुजा मोठ्या भक्तिभावाने करतात. नागपंचमीच्या दिवसाचे औचित्य साधून घरी स्थापना करण्यात येणाऱ्या नागदेवताच्या मातीच्या मूर्ती घडविण्याचे काम हे चिरनेर गावातील कला नगरातील गोरे कुटुंब गेली अनेक वर्षे करत आहेत.या संदर्भात माहिती देताना दिपा गोरे व दिपक गोरे कुटुंबानी सांगितले की नागपंचमी हा सण देशात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.ग्रामीण व शहरी भागात ही हा सण मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो.त्यामुळे नाग देवतांच्या मूर्तीना मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने आम्ही कुटुंब दिड हजार नाग देवतांच्या मूर्ती घडविण्याचे काम हे गेली वीस वर्षे आपल्या कुटुंबासह करत आहोत.आणि नागपंचमी उत्सवाचे औचित्य साधून दोन दिवस अगोदर गावात तसेच मुंबई,दादर येथील बाजारपेठेत विक्रीसाठी घेऊन जात असतो.या विक्रीतील मोबदल्यात मिळणाऱ्या पैशातून आमच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी सहकार्य प्राप्त होत आहे.

# कोलाड सपोनि सुभाष जाधव यांना आदिवासी मित्र पुरस्कार

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड पोलिस ठाण्याचे सपोनि सुभाष जाधव यांना आदिवासी मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सोमवार दि.९ ऑगस्ट २०२१ रोजी जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून दक्षिण रायगड आदिवासी हितरक्षक संघटना व एकलव्य आदिवासी संघटना रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने वनवासी कल्याण आश्रमशाळा उतेखोल येथे कोलाड पोलिस ठाण्याचे सपोनि सुभाष जाधव यांना आदिवासी मित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

कोलाड ठाण्याचे सपोनि सुभाष जाधव यांनी आदिवासी समाजाच्या सर्व समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी आदिवासी समाजाला योग्य त्या दिशा दाखविण्यासाठी मोलाचे सहकार्य केले आहे. तसेच कोरोना काळात आदिवासी समजासाठी धान्य वाटप तसेच शिक्षण क्षेत्रात व व्यावसाय करण्यासाठी सुभाष जाधव यांनी आदिवासी समाजाला वेळोवेळी मार्गदर्शन केले या साठी सुभाष जाधव यांना आदिवासी मित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे

# मोहक वाघमारे हिचे बारावी परीक्षेत सुयश

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोह्यतील प्रकाश वाघमारे यांची सुकन्या व आयुर्विमा महामंडळ रोह्याचे अधिकारी यांची पुतणी असणारी कु.मोहक प्रकाश वाघमारे हिने बारावी परीक्षेत विज्ञान शाखेत उज्ज्वल यश संपादित करून ९४ % इतके गुण संपादित केले आहेत.

बालवयापासून प्रत्येक बाबतीत हुशार व विविध कलाकौशल्ये अंगी असणाऱ्या मोहकचे सर्व शालेय शिक्षण जे.एम.राठी इंग्लिश स्कूल रोठ रोहा येथे झाले. तर बारावी बोर्डाची परीक्षाही तिने राठी हायस्कूलमध्ये पूर्ण केले. आपली हुशारी व विविध गुणकौशल्य अंगी असणारी मोहक ही कॉंलेजमध्ये सर्वच बाबतीत नेहमीच प्राधानान्याने पुढे असायची.बारावी परीक्षेत व्ज्ञिान शाखेतून ९४ % इतके गुण संपादित केले असल्याने आमच्या परिवाराचे व समाजाचे तसेच राठी हायस्कूलचेही नावलौकिक केले असल्याची भावना आयुर्विमा अधिकारी प्रकाश वाघमारे यांनी व्यक्त केली आहे.

तिच्या या सुयशाबद्दल राठी हायस्कूलचे सर्व व्यवस्थापन अधिकारी, सर्व शिक्षकव्रुंद तसेच समाजातील सर्व स्तरातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी व शिक्षणप्रेमी नागरिक यांच्याकडून अभिनंदन व्यक्त केले जाऊ लागले आहे.

---

मा.श्रीमती.गोडसे साहेब

अर्जदारांतर्फे वकील
सौ.निलम लक्ष्मण पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०३४/२०२१
नि.नं.८
ने.ता.२०/०९/२०२१

श्रीमती.उषा तपेस्वर लस्कर
वय : ६९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पारोलीगुरी, कामपूर टाऊन,
कामपूर नागांव, आसाम, ७८२४२६ — अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.रिमझिम दिपेन लस्कर
उर्फ श्रीमती.रिमझिम बोरा
वय : सज्ञान, धंदा : घरकाम
रा.कॉलेज रोड, कामपूर कॉलेज जवळ,
कामपूर, नागांव, आसाम, ७८२४२६ — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार ही सामनेवाला हिची सासू आहे. सदर अर्जार यांचा मुलगा व सामनेवाले यांचे पती दिपेन तपेस्वर लस्कर हे दि.२६/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर दिपेन तपेस्वर लस्कर यांच्या मालकीच्या मौजे : हेदुटणे, ता.पनवेल येथील सदनिकेचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

अ) मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१, मध्ये ग्रीनवूड इस्टेट, फेज २ मधील पहिला मजला, विंग- I-३, फ्लॅट नं.१०५, १ बी.एच.के., क्षेत्र-२७.४६५ चौ.मी. (कारपेट) अधिक बाल्कनी क्षेत्रफळ-५.३५५ चौ.मी. क्षेत्रफळ असलेली सदनिका

ब) मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१ मध्ये ग्रीनवुड इस्टेट, फेज २ मधील पहिला मजला, विंग- I-३, फ्लॅट नं.१०४, १ आर.के., क्षेत्रफळ (कारपेट) २२.१७ चौ.मी., अधिक बाल्कनी क्षेत्रफळ २.६१ चौ.मी. क्षेत्रफळ असलेली सदनिका

सदर सदनिका अर्जदार व सामनेवाली हिच्या नावे होण्याकरिता त्यांनी ते कै.दिपेन तपेस्वर लस्कर यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार व सामनेवाले यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१० माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.श्रीमती.गोडसे साहेब

अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर
सौ.निलम विशाल मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०२६/२०२१
नि.नं.८
ने.ता.२०/०९/२०२१

सौ.करिश्मा योगेश म्हात्रे
उर्फ करिश्मा नरेश ठाकूर
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या मागे,
मु.पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड
२) कु.मानव नरेश ठाकूर
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.मु.पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ व २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ-बहिण आहेत. अर्जदार नं.१ व २ यांची आई आरती नरेश ठाकूर उर्फ लिला सखाराम ठाकूर या दि.०५/०९/२०१७ रोजी मौजे : चिरनेर, ता.उरण येथे मयत झालेल्या आहेत. सदर मयत आरती नरेश ठाकूर उर्फ लिला सखाराम ठाकूर यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : न्हावे, ता.पनवेल येथील जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | अ | ४७१ | ०-३५-० | १-७५ |
| | २/९४ | अ | ९३७ | ०-३७-० | २-०६ |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत आरती नरेश ठाकूर उर्फ लिला सखाराम ठाकूर यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत आरती नरेश ठाकूर उर्फ लिला सखाराम ठाकूर यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१० माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर
सौ.निलम विशाल मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०२८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०९/२०२१

१) कु.मधुरा प्रभुराव केदार
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
२) कु.मानस प्रभुदास केदार
वय : वर्षे, धंदा : नोकरी
दोघेही रा.कल्पतरु को.ऑप.हौसिंग सोसायटी,
१२/२, रिस मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी सदर अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील प्रभुराव विलासराव केदार हे दि.१३/०९/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदारांची आई ज्योती प्रभुराव केदार या देखील दि.१२/०५/२०१५ रोजी मयत झाल्या आहेत. सदर मयत प्रभुराव विलासराव केदार यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत आहे.

मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड येथील गट नं.१७८, हिस्सा नं.३ पैकी, प्लॉट नं.३, क्षेत्र ५०६.३५ चौ.मी., आकार १०-१३ या भूखंडावरील कल्पतरु को.ऑप.हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं.३, २ रा मजला, फ्लॅट नं.१२, क्षेत्र ६०० स्क्वेअर फुट बिल्टअप ही सदनिका.

तसेच कै.प्रभुराव विलासराव केदार यांनी त्यांच्या हयातीत त्यांच्या नावे भारतीय जीवन बिमा निगम मधील जीवन छाया पॉलिसी शाखा ठाणे यांचेकडे खालील वर्णनाच्या पॉलिसीज् असून सदर पॉलिसीज्चे वारस (नॉमिनी) म्हणून सदर अर्जदारांची आई मयत ज्योती प्रभुराव केदार यांचे नावे आहे.

| अ.क्र. | पॉलिसी नं. | मिळणारी रक्कम रु.पै. |
|---|---|---|
| १ | ९२१३०७५१५ दि.०५/०५/२००१ | १,००,०००/- |

वर नमूद सदनिका आणि पॉलिसीचे लाभ अर्जदारांस मिळण्याकरिता अर्जदारांनी ते त्यांनी ते प्रभुराव विलासराव केदार आणि ज्योती प्रभुराव केदार यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.११ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.श्रीमती.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०१६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०१/१०/२०२१

१) श्री.दिनेश लक्ष्मण काळे
वय : ७० वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी/९, सद्गुरु सोसायटी, टिळक रोड,
कोप्री, कोप्री पोलीस स्टेशन जवळ,
ता.जि.ठाणे, ४००६०३
२) श्री.शशिकांत लक्ष्मण काळे
वय : ६३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.एफ १/४०६, गोविंद धाम, फेज-२ सोसायटी,
सह्याद्री सोसायटी समोर, मुंबई-पुणे रोड,
कळवा, ता.जि.ठाणे ४००६०५
३) श्री.सुरेंद्र लक्ष्मण काळे
वय : ६१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ए/१९/०३, सुर्योदय सोसायटी,
नवरत्न हॉटेल समोर, सेक्टर ४८, नेरुळ,
सीवूड, नवी मुंबई ४००६१५
४) श्रीमती.सुप्रिया सुरेश गंगाधरे
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.३०२, मिलेनियम पार्क, बिल्डींग नं.३,
हरी ओम नगर, मुलुंड ईस्ट, मुंबई ४०००८१
५) श्रीमती.शुभांगी जयवंत तुपे
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.शासकीय निवास, रुम नं.१,
कमळाकर कॉम्प्लेक्स, भिवंडी-वाडा रोड,
मु.पो.शेलार, ता.जि.ठाणे ४२१३०२ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ ते ५ हे एकमेकांचे सख्खे भाऊ-बहिण आहेत. सदर अर्जदारांची आई लक्ष्मीबाई लक्ष्मण काळे उर्फ पुर्वाश्रमीची लक्ष्मीबाई दयाराम साखरे या दि.०३/१२/२०१३ रोजी मयत झाल्या असून त्यांचे सामाईक मालकीची मौजे : ओवळे, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४/२००० | १७९+१८०+१८२+१८४ | ५ | १-२१.० | ३=२० | उलवे-१९९८ |

वर नमूद केलेली मिळकत व सदर मिळकतीच्या संपादनापोटी मिळणारे विविध लाभ मयत लक्ष्मीबाई लक्ष्मण काळे उर्फ पुर्वाश्रमीची लक्ष्मीबाई दयाराम साखरे यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदारांस मिळण्याकरिता त्यांनी ते लक्ष्मीबाई लक्ष्मण काळे उर्फ पुर्वाश्रमीची लक्ष्मीबाई दयाराम साखरे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.११ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.राव साहेब सो.

अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०२७/२०२१
नि.नं.८
ने.ता.२९/०९/२०२१

१) श्री.रघुवीर गणपत पाटील
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
रा.श्रीप्रसाद निवास, गुरव आळी,
ता.पेण, जि.रायगड
२) श्री.प्रल्हाद गणपत पाटील,
वय : ६६ वर्षे, धंदा : शेती
रा.जी.३१०३, ३१ वा मजला, जी विंग,
ॲझियानो रुस्तमजी, अरबानिया, माजिवडे, ठाणे
३) श्रीमती.रजनी उल्हास माने
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.प्लॉट नं.४०६, सर्व्हे नं.२५१/अे
१५ बी, किल्ले कर्नाळा मार्ग,
म्हाड कॉलनी, ता.पेण, जि.रायगड
४) सौ.सुरेखा सुनील डंगर
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मुद्रे खुर्द ९५, श्री समर्थ कृपा,
विठ्ठल मंदिराजवळ, मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड
५) श्रीमती.शुभांगी अनंत पाटील
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.तीनविरा हायस्कूल, खिडकी, ता.अलिबाग, जि.रायगड
६) श्री.सदानंद गणपत पाटील
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
रा.श्री समर्थ कृपा बंगला, नांदिवली टेकडी,
विद्यासागर हायस्कूल जवळ,
नांदिवली रोड, डोंबिवली (पुर्व) — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ व ६ हे एकमेकांचे सख्खे भाऊ-बहिण आहेत. अर्जदार नं.१ व २ यांची आई निराबाई गणपत पाटील या दि.२०/०४/२०१३ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत निराबाई गणपत पाटील यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि.यांनी साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केल्या असून, सदर जमीन मिळकतींचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे :

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्रं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | सिडको संचिका क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वहाळ-३७५/ब | १९० | १ | ०-०३.६ | १५९३ |
| २ | वहाळ-३७५ | ८२ | १० | ०-०१.० | |
| ३ | | ८२ | ६ | ०-०३.० | |
| ४ | | ८२ | ८ | ०-३४.० | |
| ५ | | १२३ | ३ | ०-०२.० | |

**मौजे : उलवे, ता.पनवेल, येथील सेक्टर ३ मधील भूखंड क्र.६८, क्षेत्र ३५० चौ.मी. हा भूखंड**

आता वर नमूद मिळकतींच्या संपादनापोटी मिळणारे भूखंड व इतर लाभ मयत निराबाई गणपत पाटील यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदार यांस मिळणेकरिता अर्जदारांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत निराबाई गणपत पाटील यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१० माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## गोमाशी ग्रामपंचायत सरपंचपदी शेकापचे संजय भालेराव

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील गोमाशी सरपंच पदी शेकापचे संजय भालेराव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच पदासाठी संजय वसंत भालेराव यांचा केवळ एकच अर्ज आला होता. त्या अर्जाला सूचक म्हणून भूषण सुतार यांनी सहमती दर्शविली. एकच नामनिर्देशनपत्र आल्याने उपस्थित उमेदवार सरपंच आरक्षणानुसार अनुसूचित जातीचा असून तो वैध आहे असे घोषित करून अध्यासी अधिकारी यांनी बिनविरोध सरपंच म्हणून संजय भालेराव यांची नियुक्ती केली. शेतकरी कामगार पक्षाचे नेते सुरेश खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना सोबत घेऊन एकविचाराने यापुढे ग्रामपंचायतीचा विकास करू असे नवनिर्वाचित सरपंच संजय भालेराव यांनी सांगितले. यावेळी अध्यासी अधिकारी सचिन वाघ, तलाठी संजय बोरंबे, कोतवाल ललित फसाळे, उपसरपंच भूषण सुतार, माजी सरपंच पूजा पवार, मुरलीधर सुतार, दामोदर मगर, हरिदास गायकवाड, जितेंद्र खैरे, ज्ञानेश्वर जाधव, संतोष उतेकर, दत्ताराम खैरे, विद्यमान सदस्य शरद उतेकर, नंदिनी जाधव, दिपाली खैरे, शर्वरी जंगम व ग्रामस्थ उपस्थित होते.



## मुरुड मध्ये ई- पीकपाहणी प्रकल्प प्रशिक्षण-प्रबोधन सप्ताह

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तहसील कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहायक यांच्या तर्फे दि.९ ऑगस्ट ते दि.१४ ऑगस्ट २०२१ या कालावधीत ग्रामपंचायत पातळीवर शेतकऱ्यांसाठी ई-पीकपाहणी प्रकल्प प्रशिक्षण-प्रबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरचे प्रशिक्षण वर्ग संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित केले जाणार आहेत.तरी मुरुड तालुक्यातील शेतकरी बांधवांनी या पीकपाहणी प्रकल्प प्रशिक्षण-प्रबोधन वर्गाचा लाभ घ्यावा. असे आवाहन तहसील कार्यालयाचे मुरुड मंडळ अधिकारी विजय मापुस्कर यांनी केले आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पोलादपूर तालुक्यात पावसाळ्यापूर्वी १५ संभाव्य दरडग्रस्त गावांना पाठवला जातो सुरक्षित ठिकाणी जाण्याचा फतवा

## २००५ पासून केवनाळे होते यादीत; धोक्याची ठिकाणे वाढली

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील केवनाळे आणि साखर सुतारवाडी या गावांवर यंदा दरड कोसळून ११ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर पुढे आलेल्या धक्कादायक वास्तवामध्ये केवनाळे गांव२००५ पासून संभाव्य दरडग्रस्त गावाच्या यादीत समाविष्ठ असून दरवर्षी पावसाळ्यामध्ये केवनाळे गावाला सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याच्या नोटीस मिळाल्या आहेत. माती उत्खनन करण्याच्या घटनांमुळे पोलादपूर तालुक्यातील संभाव्य दरडग्रस्त क्षेत्रामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये वाढ झाली असून पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे आणि देवळे या दोन धरणांनादेखील या माती उत्खननामुळे धोका निर्माण झाला आहे.

पोलादपूर तालुक्यात २५ व २६ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीदरम्यान कोंढवी, कोतवाल, लोहारे पवारवाडी तसेच अन्य गावांमध्ये दरडी कोसळून मोठ्या प्रमाणात वित्त व जिवितहानी झाली. यानंतरच्या पुनर्वसन वसाहतींचीदेखील वाताहत झाली असून आदिवासींना घरकुलं मिळालेली वापरात आहेत. प्रशासनाने आपत्ती निवारण कायद्याच्या अनुषंगाने दरवर्षी संभाव्य दरडग्रस्त गावांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याच्या नोटीसा बजावण्याचे कर्तव्य पार पाडले आहे. मात्र, सुरक्षित ठिकाणी जाऊन पुन्हा जेवण्यासाठी आपल्याच असुरक्षित ठिकाणी असलेल्या घरात येऊन जेवण्याची अपरिहार्यता या नोटीसांमध्ये कुठे राहायचे आणि जेवायचे कुठे





याबाबत स्पष्ट निर्देश नसल्याने निर्माण झाली. पोलादपूर तालुक्यातील १५ महसुली गावांवर दरड कोसळण्याची शक्यता असून प्रशासन या नैसर्गिक आपत्तीसाठी सज्ज आणि सतर्क असल्याची माहिती प्रशासनाने दिली. मात्र, २००५ पासून ही यादी कायम असून अनेकदा दरड कोसळण्याच्या घटना इतरत्र होऊनही यादीमध्ये सदर दरडग्रस्त गावांची नोंद करण्यात यादीमध्ये करण्यात आली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे, कोतवाल खुर्द, सवाद, चरई, केवनाळे, पार्ले, कोंढवी, सडवली, तुटवली, ओंबळी, महाळुंगे, परसुले, भोगावे येलंगेवाडी, माटवण, हावरे ही पंधरा महसुली गावे पावसाळ्यामध्ये धरणग्रस्त होण्याची शक्यता असल्याचे सन २००५ भूस्खलनानंतर दरवर्षी प्रशासनाकडून जाहीर केले जात आहे. महामार्गावरील डोंगर कापण्याने तसेच महाबळेश्वर मार्गावरील डोंगर कापण्यामुळे तसेच केवनाळे येथेही आंबेमाचीपर्यंतचा रस्ता करताना भरावासाठी डोंगराची माती वापरल्याने दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. साखर सुतारवाडी येथील यंदा दरड कोसळण्याची घटना प्रशासनाला अनपेक्षित होती. तालुक्यात केवनाळे आणि साखर सुतारवाडीतील दूर्घटनांनंतर आलेल्या मदतीचा ओघ संपूर्ण तालुक्याला आगामी काही महिने पुरण्याइतपत असून संभाव्य दरडग्रस्त गांवांना यापुढे शासनाने आपत्तीनिवारण कायद्यानुसार सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करून जेवणाचीही सोय केल्यास केवनाळे येथे असुरक्षित ठिकाणी असलेल्या घरात जेवतानाच पाच जणांचे बळी गेल्याची घटना पुन्हा घडणार नाही.

याखेरीज, पोलादपूर शहरातील पार्टेकोंड येथील रस्ता आणि दाभिळ, हळदुळे, चांदके खोपड, कामथे माडाचीवाडी, नावाळे, सडवली- गोपाळवाडी, कुडपण, कापडे बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीतील काही लोकवस्तीच्या भागांमध्ये रस्ते करताना झालेल्या उत्खननामुळे मोठया प्रमाणात दगडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. आंबेनळी आणि कशेडी घाटरस्ता रूंदीकरणावेळी डोंगर बाजूचे उत्खनन तसेच ब्लास्टिंग केल्यामुळे दरड कोसळण्याचा धोका कायम निर्माण झाला आहे. २००५ साली झालेल्या अतिवृष्टी नंतर भूस्खलनामुळे कोतवाल खुर्दमधील नऊ व्यक्तीचा बळी गेला होता तर कोंढवी गावातील अनेक घरांना आणि जमिनीला भेगा पडल्या होत्या. लोहारे पवारवाडी येथे जमीन दुभंगून दोघांचा बळी गेला होता. यानंतर नैसर्गिक आपत्ती निवारण कायद्यानुसार दरवर्षी दरडग्रस्त गावांची यादी जाहीर करून प्रशासनाकडून धोका असणारी लोकसंख्या स्थलांतराचे ठिकाण संपर्क अधिकारी अथवा कर्मचारी यांची नित्यनेमाने यादी जाहीर केली जात आहे. मात्र, वाढीव दरडप्रवण क्षेत्राचा या यादीमध्ये उल्लेख दिसून येत नाही, आश्चर्याची बाब मानली जात आहे.

# माथेरानमध्ये पोस्टाचे एटीएम सुरु करण्याची महिला काँग्रेसची मागणी





**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान हे मुंबई जवळील सुप्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे . दर वर्षी दहा लाखहुन अधिक पर्यटक भेट देतात. येथे बँकेतून पैसे काढण्यासाठी युनियन बँकेचा केवळ एकमेव एटीएम आहे तो देखील ग्राहकांना योग्य सुविधा देत नाही सुट्टीच्या दिवशी तर बऱ्याचवेळा बंद असतो त्यामुळे पर्यटक व स्थानिकांची मोठी गैरसोय होते . आजकाल डिजिटल व्यवहाराचे प्रमाण अधिक वाढले आहे. पैसे न काढता आल्यास पर्यटक माघारी फिरतात व यांचा विपरीत परिणाम येथील व्यवसायावर होतो येथील रहिवाश्यांचे जीवन पूर्णतः पर्यटनावर अवलंबून आहे.

पोस्ट ऑफिस ने त्यांचे एटीएम माथेरानला सुरू करण्याची मागणी करणारे निवेदन सोमवारी पोस्ट मास्तर रमेश साबळे यांना काँग्रेस महिला आघाडीच्या अध्यक्षा वर्षा शिंदे, उपाध्यक्ष कामिनी शिंदे, खजिनदार अर्चना कदम, गिरीजा शिंदे व शुभांगी शिंदे यांनी दिले. महिलांनी केलेली मागणी योग्य असून सदर विषय वरिष्ठांच्या माहिती साठी पुढे पाठवीत आहोत असे रमेश साबळे यांनी सांगितले.

# वेलशेत-आंबेघर विसर्जन घाटावर मद्यपींचा धिंगाणा; धार्मिक विधीच्या ठिकाणावरच फोडल्या बाटल्या

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठण्याजवळच असलेल्या वेलशेत-आंबेघर गावांसाठी असलेल्या गणपती विसर्जन घाट व दशक्रिया विधीसाठी असलेल्या जागेवरच अज्ञात माथेफिरू मद्यपींकडून दारु व बियरच्या बाटल्या फोडुन धिंगाणा करण्यात आला आहे. सोमवार दि. ९ ऑगस्टच्या रात्री हा प्रकार घडल्याची शक्यता वेलशेत-आंबेघर ग्रामस्थांकडून वर्तविण्यात येत असून या प्रकाराबद्दल नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

नागोठण्याहून पोयनाड, अलिबागकडे जाण्यासाठी असलेल्या अंबा नदीवरील पुलाखालीच वेलशेत बाजूकडे, वेलशेत-आंबेघर या गावांचे हे गणपती विसर्जन घाट आहे. तसेच याच ठिकाणी या दोन्ही गावांतील ग्रामस्थ दशक्रिया हे धार्मिक विधी करीत असतात. याशिवाय या दोन्ही गावांतील स्थानिक मच्छिमारही याच ठिकाणी अंबा



नदीच्या पात्रात मासेमारी करण्यासाठी येत असतात. मात्र याची कोणतीही पर्वा न करता मद्यपींनी याठिकाणी येऊन मद्यपान केले तर केले मात्र त्यापुढेही जाऊन रिकाम्या बाटल्या फोडून धिंगाणा घालण्याचे काम केले आहे. त्यामुळे वेलशेत-आंबेघर या दोन्ही गावांतील नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. याशिवाय या फोडलेल्या बाटल्यांच्या काचांमुळे मासेमारी करण्यासाठी येणाऱ्या स्थानिक मच्छिमार बांधवांना व शेतकऱ्यांना इजा होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. त्यामुळे नागोठणे पोलिसांनी अधून-मधून याठिकाणी गस्त घालण्याचे काम सुरु करावे अशी मागणीही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या प्रकाराने संतप्त झालेल्या ग्रामस्थांकडून लवकरच नागोठणे पोलीस ठाण्यात जाऊन निवेदन देण्यात येणार असल्याचे पिगोंडे ग्रामपंचायतीचे माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष रोशन पारंगे यांनी सांगितले.

# पोलिसांची हुक्का पार्लरवर कारवाई, मालकासह १० जण ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाशी सेक्टर-११ मधील बाबा टॉवर इमारतीतील सि-शोर कॅफेमध्ये बेकायदेशीररीत्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर वाशी पोलिसांनी शनिवारी रात्री छापा मारुन मालकासह हुक्का ओढण्यासाठी बसलेल्या एकुण १० जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व तंबाखुजन्य पदार्थ देखील जप्त केले आहे. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर राज्य शासनाने रेस्टारंट, बार व इतर आस्थापना सुरु ठेवण्यासंदर्भात नियम व अटी लागु केलेले असताना सदरचे हुक्का पार्लर शनिवारी रात्री उशीरापर्यंत बिनदिक्कतपणे सुरु ठेवण्यात आले होते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने मनाई आदेश लागू करुन सर्व प्रकारची दुकाने, बार, रेस्टारंट व आस्थापनाना सुरु ठेवण्यासाठी नियम व अटी घातल्या आहेत. असे असताना, वाशी सेक्टर-११ मधील बाबा टॉवर या इमारतीतील कॅफे सि-शोरमध्ये शनिवारी रात्री बेकायदेशीररीत्या हुक्का पार्लर सुरु असल्याची माहिती वाशी पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन ढगे व त्यांच्या पथकाने रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास कॅपे सि-शोरवर छापा मारला.

यावेळी कॅफेमध्ये कोव्हीड-१९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी राज्य शासनाने पारीत केलेल्या अधिसुचनांचे व अटिंचे उल्लंघन करण्यात आल्याचे आढळुन आले. तसेच सदर कॅफेमध्ये कुठल्याही प्रकारचे सामाजिक अंतर न ठेवता, सदरचे हुक्का पार्लर बेकायदेशीररीत्या सुरु ठेवण्यात आल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी सदर हुक्का पार्लरचा मालक फारुख दस्तगीर शेख (२८) व सदर कॅफेमध्ये हुक्का ओढण्यासाठी बसलेल्या ९ व्यक्तींवर कोरोनाच्या परिस्थितीत नियमांचे उल्लंघन करणे यासह विविध कलमांखाली गुन्हे दाखल करुन त्यांना ताब्यात घेतले आहे.

# उरण तालुक्यातील गावांना लसीकरण करण्यासाठी तहसिलदारांचे दालनात बैठक

## कंपन्यांच्या सीएसआर फंडातून उरण तालुक्यातील लसीकरण करण्याची जनतेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कोविड रोगाची साथ आटोक्यात आणण्यासाठी तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांचे दालनात तहसिल कार्यालय उरण येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उरण तालुक्यातील गावांना होत असेलला लसीचा अपुरा पुरवठा यामुळे नागरिक लसीकरणापासून वंचित आहेत.लसीकरण सर्व नागरिकांचे वेळेवर होणे गरजेचे आहे यासाठी उरण पंचायत समिती यांच्या माध्यमातून सर्व कंपनी याना लेखी पत्र देऊन लसीकरण करण्यासाठी कंपनीने सीएसआर फंडातून खर्च करावा यासाठी दोन पत्रे देण्यात आल्याची माहिती उरण पंचायत समितीचे सभापती ऍड सागर कडू यांनी उपस्थित मान्यवरांना दिली आहे.

उरण तालुक्यातील लसीकरणाचा वेगवाढविण्यासाठी तालुक्यातील सर्व कंपन्या,सर्व सि एफ एस गोडाऊन यांनी एकत्रित रित्या खर्च करून सामाजिक दायित्व भूमिका घेऊन यासाठी



येणारा सर्व खर्च करावा असेही मत व्यक्त करण्यात आले.यावेळी विविध कंपनीचे प्रतिनिधी हजर होते. या निर्णयामुळे तालुक्यातील लसीकरण वेगाने होऊन कोरोना मुक्ती कडे वाटचाल होईल.शेकडो लोकांचे जीव वाचतील. कोरोना मध्ये नोकरीं नाही, रोजगार नाही, जवळ पैसा नाही अश्या परिस्थितीत गोरगरीब जनतेला या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे. या निर्णयाचे उरणच्या नागरिकांकडून, सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

या वेळी तहसिलदार भाऊसाहेब अंधारे,पंचायत समिती उरणचे सभापती ऍड सागर कडू, उपसभापती शुभांगी सुरेश पाटील,पंचायत समिती गटविकास अधिकारी नीलम गाडे,पंचायत समिती सदस्य वैशाली पाटील,जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, पंचायत समिती सदस्य दीपक ठाकूर,जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर,पंचायत समिती सदस्य हिराजी भोईर,माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड,उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेंद्र इटकारे, डॉ भोसले व विविध कंपनीचे प्रतिनिधी हजर होते.

# कोकणस्थ तेली समाजसेवा संस्थेचा पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रायगड जिल्हा कोकणस्थ तेली समाज सेवा संस्थेतर्फे रविवार दि. ८ ऑगस्ट रोजी महाड तालुक्यातील एक दोन ठिकाणी तसेच बिरवाडी, भावे, आदर्श नगर बुद्धवाडी, काळीज गाव आदिवासी वस्ती, वाळण बुद्रुक गावातील काही पूरग्रस्तांना सिलींग पंखे, एलईडी दिवे चार्जिंग लॅम्प वस्तुंच्या संचाचे वाटप करुन मदत करण्यात आली. पूरग्रस्तांना एक हात मदतीचा म्हणुन कोकणस्थ तेली समाजाचे संजय राहटे यांच्या सौजन्याने त्यांच्या मुंबई पंढरपूर यात्रा कांदवली गृपतर्फे ३६ पंखे मदत देण्यात आल्याचे संस्थेच्या अध्यक्षांनी सांगितले

मुंबई येथुन पूरग्रस्त भागातील या गावात प्रत्यक्ष येऊन संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र रहाटे तसेच प्रांतिक महिला अध्यक्षा रोहिणी महाडिक तसेच कार्याध्यक्ष शांताराम दळवी, सल्लागार रत्नाकर महाडिक, व पदाधिकारी संतोष दळवी, अनिल उबाळे आदी संस्थेच्या मान्यवरांनी जवळपास चाळीस पूरग्रस्त कुटुंबियांना सिलींग फॅन, चार्जिंग लॅम्प, एलईडी बल्ब या वस्तुंचा संच वाटप केले आहे. महापूरात अनेकांच्या घरातील या विजेवरील चालणाऱ्या वस्तुंचे फारमोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. यामुळे अशा प्रकारच्या वस्तुंचे वाटप केल्याने पूरपिडीतांनी समाधान व्यक्त केले असल्याचे संस्थेच्या वतिने सांगण्यात आले.



# ट्रेलरच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव ट्रेलरच्या धडकेत एका पादचार्या चा मृत्यू झाल्याची घटना पळस्पे परिसरात घडली आहे.

मनोजकुमार कमलाकांत झा (३५ रा.कोन गाव) हा सुरक्षा रक्षकाचे काम करतो. तो पळस्पे परिसरातून पायी जात असताना भरधाव वेगाने आलेल्या ट्रेलरने त्याला धडक दिल्याने झालेल्या अपघातात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्याचप्रमाणे सदर ट्रेलरची धडक तेथील पानटपरीला बसल्याने पानटपरीचेही नुकसान झाले आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रस्ता दुभाजकाला मोटारसायकल धडकून तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मैत्रीणीसह पनवेल येथे फिरण्यासाठी आलेल्या तरुणाची भरधाव वेगातील मोटारसायकल रस्ता दुभाजकावर धडकल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकल चालक तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल उरण मार्गावर घडली. या अपघातात मृत तरुणासोबत असलेली त्याची मैत्रिण देखील किरकोळ जखमी झाली आहे.

या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव अजीत रघुनाथ माटेकर (२७) असे असुन तो घाटकोपर येथील नित्यानंद नगर येथे राहण्यास होता. अजीत आपल्या मैत्रिणीसह फिरण्यासाठी पनवेल येथे आला होता. त्यानंतर अजीत आपल्या हिरो होंडा मोटारसायकलवरुन पनवेल मधील करंजाडे येथून उरणच्या दिशेने जात होता.

यावेळी त्याची मोटारसायकल उरण रोडवरील जेडब्ल्युआर कंपनीजवळ आली असताना, भरधाव वेगात असलेल्या मोटारसायकलवरील अजितचे नियंत्रण सुटले. त्यामुळे सदरची मोटारसायकल रस्ता दुभाजकावर धडकल्याने तो मैत्रीणीसह खाली पडला. या अपघातात अजितच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तो गंभीर जखमी झाल्याने काही वेळातच त्याचा मृत्यू झाला.

या अपघातात त्याची मैत्रीण सुद्धा किरकोळ जखमी झाली. या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेत अजितने निष्काळजीपणे भरधाव वेगात माटरसायकल चालविल्यामुळे सदरचा अपघात होऊन त्यात त्याचा मृत्यू झाल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे पनवेल शहर पोलिसांनी मृत अजीतवर गुन्हा दाखल केला आहे.